महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड **लोकनेता**

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंडे ●

गुरुवार ४ जून २०२६ | RNI-MAHMAR/2023/89402 | Email : dnyaneshmofficial@gmail.com | वर्ष : ०३ | अंक : २८५ | किंमत २ रुपये | 7499615933





# भव्य आयोजन नसतानाही लोकनेत्याच्या अभिवादनासाठी गोपीनाथ गडावर मोठी गर्दी!

## ना.पंकजाताई मुंडे यांचे सामाजिक बांधिलकीची साद घालणारे भाषण ; शेती, शेतकरी, वृक्षारोपण, ऊसतोड कामगारांच्या हिताचा जाहीर केला संकल्प

- दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा- पंकजाताई मुंडे
- 'एक पेड बाप के नाम' उपक्रम प्रत्येकाने राबवावा ; नवरात्रात नवा संकल्प जाहीर करणार
- सर्व नेते येऊन गेले, भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदीही गोपिनाथगडावर येतील











**लोकनेता न्यूज नेटवर्क**
बीड विजय रोडे

परळी :-लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त आज गोपीनाथ गडावर दर्शनासाठी सकाळपासूनच गर्दी झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत आवाहनाला प्रतिसाद म्हणून भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित नसतानाही लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणपूरक लोकसहभागाला साद घालणारे भाषण करत वृक्षारोपण,जैविक व नैसर्गिक शेती ,स्वाभिमान, समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, आणि शेतकरी हितासाठी रचनात्मक काम असे संकल्प जाहीर केले. सर्वांनी हे संकल्प पूर्ण करावे आणि पर्यावरणीय सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी योगदान द्यावे असे सांगत दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा असे आवाहन केले.

लोकनेते मुंडे साहेब यांच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम आज गोपीनाथगडावर अत्यंत साधेपणाने झाला. यावेळी ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई, जावई गौरव खाडे , नातू आर्यमन पालवे,अगस्त्य खाडे, बंधू अजय मुंडे, रामेश्वर मुंडे यांसह मुंडे कुटुंबियांनी समाधीचे दर्शन घेतले. त्याबरोबर मुंडे साहेबांना आवडणाऱ्या पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी आयोजित भजनाच्या कार्यक्रमात ना पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबासह सहभाग घेतला. कार्यक्रमास महंत राधाताई सानप, आ.नमिता मुंदडा, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळदादा पवार, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेश कराड, भाजप नेते गणेश हाके, प्रवीण घुगे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, माधवराव निर्मळ,योगेश क्षीरसागर , प्रा.लक्ष्मण हाके, गायताई कराड,, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी न. प. गटनेते वैजनाथ सोळंके,, भाजप गटनेते प्रा.पवन मुंडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता राम कुलकर्णी, आदींसह बीड जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

**'एक पेड बाप के नाम', गडावर वृक्षारोपण ; उपस्थितांना रोपांचे वाटप**

पर्यावरणासमोरील आव्हानांचा उल्लेख करत पंकजाताई मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या ' एक पेड मॉ के नाम' उपक्रमाबरोबरच "एक पेड़ बाप के नाम" हा संकल्प राबविण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने किमान ११ झाडे लावून त्यांचे संवर्धन करावे, प्रत्येकानी कौटुंबिक ,सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमात वृक्षारोपण करावे आणि त्याचे संवर्धन करावे असे त्यांनी सांगितले. या संकल्पाची सुरुवात त्यांनी गडाच्या परिसरात वृक्षारोपण करून केली. यावेळी विविध वृक्षांची सुमारे एक हजार रोपे उपस्थितांना वाटप करण्यात आली.

### दिवंगत एजाजभाई देशमुख यांच्या परिवाराला पाच लाख रुपयांची मदत

-----------

भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष बीड येथील दिवंगत नेते एजाजभाई देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवाराला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाख रूपयांची मदत जाहीर केली होती. आजच्या स्मृतीदिनी ना. पंकजाताई मुंडे यांनी एजाजभाई यांच्या कुटुंबियांना आज ५ लाख रुपयांचा धनादेश त्यांच्या परिवाराकडे सुपूर्द करून आपला

### भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी ही गोपीनाथ गडावर येतील

वंचित ,उपेक्षित ,दुर्बल घटकांना न्याय देण्याची भूमिका आयुष्यभर जपणाऱ्या आपल्या मुंडे साहेबांना अभिप्रेत असेच काम तुम्ही आणि मी आपण सर्वांनी करायचे आहे. आपण जसे वागू तसे परिणाम दिसत असतात. त्यामुळे स्वाभिमान जपत आपण स्वर्गातही मुंडे साहेबांची मान उंचावेल असेच काम केले पाहिजे. सामाजिक सलोखा आणि आपल्यापेक्षा क्षीण व्यक्तीच्या मदतीला आपण आले पाहिजे. जागतिक स्तरावर आज संकटाची परिस्थिती असून आपल्या देशात ही परिस्थिती उद्भवू नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने आपल्याला आवाहन करत आहेत. या देश कार्यात आपण सहभाग घेतला पाहिजे. आपल्या कृतीतून आणि माणसाला माणूस म्हणून जगता यावे या उद्देशाने प्रत्येकाने योगदान देणे अभिप्रेत आहे. गोपीनाथ गडाच्या उभारणीला अमित शहा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अनेक मंत्री, अनेक पक्षप्रमुख आले होते. सर्वच शीर्षस्थ नेते आपल्या गडावर येऊन गेले आहेत आता एकमेव पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या गडावर यायचे राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी भविष्यात गोपीनाथ गडावर नक्कीच येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### शेती, शेतकरी, ऊसतोड कामगारांच्या बांधिलकीचा संकल्प

---------------

शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, रासायनिक खतांऐवजी जैविक व नैसर्गिक शेतीचा आग्रह धरला पाहिजे. या संकल्पाची सुरुवात मी स्वतः पासून करणार असून मी स्वतः आता जैविक व नैसर्गिक प्रत्यक्षात करणार आहे आपण सर्वांनी यासाठी योगदान दिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरूप होण्याकरिता "जावे त्यांच्या वंशा, तेव्हा कळे' या न्यायाप्रमाणे मी स्वतः नांगर धरणार, ट्रॅक्टर चालवणार आणि शेती करणार आहे अशी घोषणा त्यांनी केली. तसेच ऊसतोड कामगारांच्या जीवनाशी एकरूप होत त्यांच्या सोबत 12 डिसेंबरला प्रत्यक्ष ऊसाच्या फडात जाऊन ऊसतोडणी करण्याचाही संकल्प त्यांनी व्यक्त केला.

### माझा प्रत्येक श्वास वंचित, पीडित, गरजूंसाठी

---------

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, एक तप उलटले तरी साहेबांच्या आठवणी विसरता येत नाहीत. मुलगी म्हणून माझ्या वाट्याला आलेल्या सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्य मी मुंडे साहेबांना शोभेल अशा पद्धतीने पार पाडली आहेत. स्वाभिमान जपत, सामाजिक सलोख्यासाठी जाती-धर्मांच्या भिंती भेदून अठरापगड जाती धर्मासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. बारा वर्षे झाली, पण मुंडे साहेबांचे पुण्यस्मरण करताना तुमचे निरपेक्ष प्रेम बघून आजही माझा प्रत्येक श्वास जनतेकडे गहाण ठेवून काम करत आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या निधनानंतर तुमची व माझी कधीही भरून न येणारी अशी हानी झालेली आहे. तीन जून रोजी याच ठिकाणी मी माझ्या हाताने माझा पिता आणि आपला नेता यांना अखेरचा निरोप दिला आहे. आजही मला आणि माझ्या आईला २ जूनची भयाण रात्र आठवते. साहेबांनी अगदी शून्यापासून संघर्षमय प्रवास केला. "आयुष्य लांब असण्यापेक्षा मोठे असावे," याप्रमाणे आपल्या कर्तुत्वाने आज साहेबांचे स्थान घराघरातील देव्हाऱ्यात आहे असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना समाजासाठी झटण्याचा संदेश दिला.माझा प्रत्येक श्वास वंचित, पीडित आणि गरजूंसाठी आहे.आपल्या पेक्षा दुर्बल असलेल्या व्यक्तींना मदतीचा हात द्या. दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने जगा, असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला.

### नवरात्रोत्सवात नवा सामाजिक संकल्प जाहीर करणार

---------------------

आज पर्यावरणाला पूरक होतील अशा प्रकारचे संकल्प आपण हाती घेतले आहेत यासाठी मी स्वतः निर्धार केला आहे आपणही या संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले. तसेच आगामी नवरात्रोत्सवात नवा सामाजिक संकल्प जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सामाजिक सलोखा आणि विकासाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी अधिक मजबूत करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# दुनगांव येथे स्व. गोपीनाथ मुंडे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

## प्रतिमापूजन करून कार्यकर्त्यांनी जागविल्या मुंडे साहेबांच्या आठवणी

**लोकनेता न्युज नेटवर्क**
पाचोड प्रतिनिधी | त्रिसिंग जायभाये

दुनगाव, ता. अंबड भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय ग्रामविकास मंत्री तथा जनसामान्यांचे लोकप्रिय नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. ३ जून रोजी दुनगाव येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या प्रारंभी गोविंद पा. जायभाये यांच्या हस्ते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मुंडे साहेबांच्या राजकीय, सामाजिक व जनसेवेतील योगदानाचे स्मरण केले. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी व वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे राज्याच्या राजकारणात एक वेगळा ठसा उमटला असून त्यांचे विचार आजही अनेक कार्यकर्त्यांना प्रेरणा देत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या प्रसंगी बबनराव जायभाये, तात्या मामा ढाकणे, पोलीस पाटील अमोल जायभाये, भाजप नेते बंडू खाडे, कैलास जायभाये, अरुण जायभाये, धर्मराज जायभाये, रामेश्वर मुंडे, अशोक जायभाये, प्रशांत (राजू) जायभाये, गोविंद व्यापारी, नाना खाडे, प्रदीप मगरे, संजय सौंदलमन, सतीश साबळे, परमेश्वर जायभाये, कानिफनाथ जायभाये, बालाजी जायभाये यांच्यासह ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुण्यतिथीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी केलेले कार्य आणि जनतेशी कायम राखलेले जिव्हाळ्याचे नाते याबद्दल उपस्थितांनी गौरवोद्गार काढले. शेवटी उपस्थितांनी त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला.

# गुणवंतांचा भव्य गौरव; समाजाच्या प्रगतीचा नवा अध्याय!

## धनोजे कुणबी समाजाच्या 'गुणवंत गौरव सन्मान सोहळा – २०२६' ला उत्स्फूर्त प्रतिसाद

### विद्यार्थी, खेळाडू, शेतकरी आणि विविध क्षेत्रातील कर्तृत्ववानांचा झाला दिमाखदार सत्कार

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
कोरपणा : पवन लक्ष्मण देरकर

चंद्रपूर : गुणवत्तेचा सन्मान, कर्तृत्वाचा गौरव आणि समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणेचा संदेश देणारा "गुणवंत गौरव सन्मान सोहळा – २०२६" हा भव्य कार्यक्रम धनोजे कुणबी समाज मंदिर, लक्ष्मीनगर, चंद्रपूर यांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्यात समाजातील गुणवंत विद्यार्थी, पीएच.डी. धारक, नेट-सेट उत्तीर्ण युवक-युवती, नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवक, विविध क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे खेळाडू, प्रगतशील शेतकरी तसेच समाजाच्या विविध क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे उद्घाटन मा. खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी धनोजे कुणबी समाज मंडळाचे अध्यक्ष मा. श्रीधरराव मालेवर होते. प्रमुख अतिथी म्हणून मा.




आमदार देवराव भोंगळे, मा. मनोहरजी पाऊणकर, मा. डॉ. संतोषजी सुरडकर, मा. संजयजी ढवस, मा. रवीजी झाडे आणि मा. अतुलजी देऊलकर उपस्थित होते.या गौरवशाली सोहळ्यात अनेक मान्यवरां चा सत्कार करण्यात आला. समाजाकडून मिळालेला हा सन्मान अधिक जोमाने आणि जबाबदारीने समाजहिताचे कार्य करण्यासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष विजयरावजी टोंगे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. संतोषजी सुरडकर यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर, स्पर्धा परीक्षा आणि सामाजिक बांधिलकीबाबत मार्गदर्शन करताना यशस्वी जीवनासाठी कठोर परिश्रम आणि सातत्याचे महत्त्व अधोरेखित केले.

समाजातील गुणवंतांचा गौरव म्हणजे केवळ व्यक्तींचा नव्हे तर त्यांच्या परिश्रम, जिद्द आणि कर्तृत्वाचा सन्मान आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांना प्रेरणा मिळून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असा सूर उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.


कार्यक्रमाला समाजातील पदाधिकारी, पालक, युवक-युवती आणि समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

धनोजे कुणबी समाजाचा हा उपक्रम समाजातील गुणवंतांना प्रोत्साहन देणारा आणि नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# वादळी वाऱ्यामुळे टिनचे पत्रे उडून ज्येष्ठ महिलेचा दुर्दैवी मृत्यू;

## फुटाणा मोकासा गावावर शोककळा






**लोकनेता न्यूज नेटवर्क**
*रुपेश मंकीवार | पोंभुर्णा तालुका प्रतिनिधी

पोंभुर्णा तालुक्यात गुरुवारी दुपारच्या सुमारास आलेल्या जोरदार वादळी वाऱ्यामुळे दुर्दैवी घटना घडली असून फुटाणा मोकासा येथील एका ज्येष्ठ महिलेचा मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फुटाणा मोकासा येथील रहिवासी लहानुबाई नानाजी पाल (वय 70 वर्षे) या आपल्या घराजवळ उभ्या असताना अचानक आलेल्या प्रचंड वादळी वाऱ्यामुळे घरावरील लोखंडी टिनपत्रे उडून गेली. टिनपत्रांना आधार देण्यासाठी लावलेला लाकडी फाटा जोरदार वाऱ्याच्या झोताने तुटून थेट त्यांच्या अंगावर कोसळला. या अपघातात त्यांना गंभीर दुखापत झाली असून त्यांचा जागीच मृत्यू झाला. अचानक घडलेल्या या घटनेने पाल कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावकऱ्यांनी हळहळ व्यक्त केली आहे. घटनेची माहिती मिळताच बेबाळ पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पुढील वैद्यकीय तपासणीसाठी मुल ग्रामीण रुग्णालयात पाठविला. या प्रकरणाची नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, पोंभुर्णा तालुक्यासह परिसरात आलेल्या वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी टिनपत्रे उडून जाणे, झाडांच्या फांद्या तुटणे तसेच मालमत्तेचे नुकसान झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

मान्सूनपूर्व काळात अचानक निर्माण होणाऱ्या वादळी परिस्थितीत नागरिकांनी सतर्क राहून सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले

# प्रलंबित पिक विम्याच्या वाटपाच्या मागणीसाठी शिवसेना (ठाकरे ) पक्षाच्या वतीने नांदेडच्या पिकविमा कंपनीला ठोकले टाळे

**लोकनेता न्युज नेटवर्क**
देगलूर प्रतिनिधी/संतोष चिद्रावार लोणीकर

देगलूर -- नांदेड नविन मोंढा येथील AIC भारतीय कृषी वीणा कंपनी agriculture insurance company of India LED या कंपनीच्या ऑफीसला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शेतकरी बांधवांना त्वरित उर्वरित मंडळातील गावांना पिकविमा वाटप करण्यात यावे अशी मागणी करीत व अद्याप पर्यंत पिकविमा वाटप न केल्याच्या निषेधार्थ घोषणाबाजी करुन कुलूप लावून शटर बंद करण्यात आले यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, शिवसेना देगलूर शहर प्रमुख भगवान जाधव, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर सचिन इबितवार तमलूरकर, अर्जून लुटे अल्लापुरकर आदी उपस्थितीत होते. या बाबतीत अधिक माहिती अशी की या वर्षी अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी भारत लिमिटेड या पिक विमा कंपनीला देण्यात आले शासनाने व विमा कंपनीने या वर्षी ओला दुष्काळ पडून खरीप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात ११० टक्के नुकसान झाले असल्याने प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत २०२५ = २६ वर्षा करीता नांदेड जिल्ह्यातील सोयाबीन साठी ८८४.७२ कोटी रुपये तर युग, उडीद, तुर व खरीप हंगामातील ज्वारीसाठी३ . ९५ कोटी असा एकूण ८८८.६७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले या पैकी ५०२ कोटी रुपये वाटप करण्यात आले देगलूर तालुक्यातील ७ मंडळापैकी ५ मंडळात पीक विमा वाटप करण्यात आले.पण सध्या खरीप हंगामातील खते , बियाणे, किटकनाशके डिझेल, आदी तात्काळ खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे मागील ५ वर्षा पासून सतत ओला दुष्काळ पडल्याने शेतकरी राजा कंगाल व कर्ज बाजारी झाला आहे खते बियाणे खरेदी करण्यासाठी पैसे जवळ नाहीस कोणी उधारी उसनवारी साठी जवळपासही येऊ देत नाहीत अशातच शासनाने खते व बियाणे चे भाववाढ केल्याने शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली आहे ज्यावर शेतकऱ्यांना अशातच शेतकऱ्यांची खते बियाणे खरेदी करण्यासाठी ज्याच्यावर दारोमदार अवलंबून आहे असा हक्काचा



पिक विमा देगलूर, खानापूर, मरखेल आदी मंडळातील गावांतील शेतकरी बांधवांना राज्य शासनाकडून ३८५- ११ कोटी निधी विमा कंपनीनीला प्राप्त न झाल्याचे कारण दाखवून अद्याप पर्यंत पिकविमा वाटप करण्यात आले नसल्याने पावसाळा जवळ आल्याने शेतकऱ्यांना महागामोलाची बियाणे खरेदी करण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे तीव्र नाराजी पसरली असून त्वरित पीकविमा वाटप करण्यात यावे अशी शेतकरी बांधवांची रास्त मागणी आहे पिक विमा वाटप करण्यात यावे म्हणून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उपजिल्हाधिकारी व तहसीलदार कार्यालयासमोरील तीव्र निदर्शने, घोषणाबाजी करण्यात आली पण पिक विमा वाटप न झाल्याने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी नांदेड येथील नवा मोंठा परीसरातील अग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी भारत लिमिटेड या कंपनीचे कार्यालय गाठून पिक विमा अद्याप पर्यंत का वाटप करण्यात आले नाही याचा जाब विचारण्यात आला राज्य शासनाकडून निधी उपलब्ध होताच पिक विमा वाटप करु अशी उडवाउडवीची उत्तरे उपस्थितीत अधिकाऱ्यांनी दिल्याने शिवसेना पदाधिकारी यांचे समाधान झाले नसल्याने पिक विमा तात्काळ वाटप करण्यात यावे, राज्य शासनाकडून पिक विमा कंपनीला अनुदानाची रक्कम त्वरित देण्यात यावे, अशी मागणी व घोषणाबाजी करीत व पिक विमा अद्याप वाटप न केल्याच्या निषेधार्थ पिक विमा कंपनीला शटर बंद करुन कुलूप (ताळे) लावण्यात आले यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील देगलूर बिलोली विधानसभा मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर शिवसेना देगलूर शहर प्रमुख भगवान जाधव, युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल मीडिया नेटवर्क प्रमुख भागवत पाटील सोमुरकर सचिन इबितवार तमलूरकर, अर्जून लुटे अल्लापुरकर आदी उपस्थितीत होते

# संपादकीय

## ग्रीन ऑस्करवर स्त्रीशक्तीचा ठसा “

निसर्ग साखळीचा मुख्य कणा छोटे उभयचर आणि दुर्मिळ पक्षी आहेत.पण अनेकदा सरकारी धोरणांपासून व जनमानसाच्या नजरेतून ते सुटून जातात.याच निसर्गरम्य परिसराच्या कुशीत एक आदिम जीव आपले अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत आहे.ज्याचे नाव ‘ हिमालयीन सॅलामँडर ‘आहे. सरड्यासारखा दिसणारा हा उभयचर प्राणी कोट्यावधी वर्षापासून पृथ्वीवर अस्तित्वात आहे.हा केवळ एक प्राणी नाही,तर तो ज्या पाणथळ जागेत राहतो,तिथल्या पर्यावरणाच्या शुद्धतेचा तो जिवंत पुरावा आहे. या प्राण्याकडे आपले गमावलेले अवयव पुन्हा नैसर्गिकरीत्या तयार करण्याची अद्भुत क्षमता आहे.पण मानवी हस्तक्षेपामुळे हा प्राणी नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.पश्चिम बंगालमधील दार्जिलिंगमध्ये अनियंत्रित पर्यटन, चहाच्या बागांचे वाढते व्यापारीकरण आणि रस्ते बांधणीमुळे तेथील लहान लहान तलाव आणि पाणथळ जागा नष्ट होत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे संपूर्ण दार्जिलिंगमध्ये आता सॅलामँडरची केवळ ३० प्रजनन स्थळे शिल्लक उरली आहेत आणि त्यातील बहुतांश जागा सरकारी संरक्षित वनक्षेत्राच्या बाहेर म्हणजेच मानवी वस्तीजवळ आहेत.

दार्जिलिंगच्या घनदाट जंगल्यात वाढलेल्या डॉ.बरखा सुब्बा यांनी ‘फेडरेशन ऑफ सोसायटीज फॅार एन्व्हायर्नमेंटल प्रोटेक्शन ‘या संस्थेच्या माध्यमातून या संकटावर वैज्ञानिक तोडगा शोधला असून आता सर्वात संवेदनशील अशा सात प्रजनन स्थळांचे त्या पुनरूज्जीवन करणार आहेत.यामध्ये तलावांमधील आक्रमक वनस्पती काढून टाकणे, स्थानिक वनस्पतींची लागवड करणे आणि उभयचरांसाठी अत्यंत घातक मानल्या जाणाऱ्या “ कायट्रिड बुरशीजन्य ‘आजाराचे स्क्रिनिंग करणे समाविष्ट आहे,पण डॉ.बरखा सुब्बा यांचे खरे यश हे आहे की,त्यांनी चहाच्या बागांचे व्यवस्थापक, स्थानिक तरूण आणि महिलाांना या मोहिमेत सामील करून घेतले आहे.त्यांना पर्यावरणपूरक पर्यटनाचे प्रशिक्षण देऊन ही स्थानिक राजगाराची संधी बनवली आहे.

दुसरीकडे विख्यात ‘बॉम्बे नॅशनल हिस्टरी सोसायटी ‘ च्या ज्येष्ठ शास्रज्ञ परवीन शेख यांनी आपले संपूर्ण आयुष्य ‘इंडियन स्किमर ‘ या अत्यंत देखण्या आणि संकटग्रस्त नदीय पक्ष्यासाठी वाहून घेतले आहे.वरचा भाग काळा, खालचा भाग पांढरा आणि कात्रीसारखी लांब नारंगी-लाल चोच असलेला हा पक्षी पाण्यावर अत्यंत वेगाने तरंगत मासे पकडतो. एकेकाळी संपूर्ण आग्नेय आशियात मुक्तपणे विहरण करणाऱ्या या पक्ष्याची जागतिक लोकसंख्या आता कमालीची घटली असून त्यातील ९० टक्के पक्षी केवळ भारत आणि बांगलादेशात उरले आहेत.चंबळ नदी हे त्यांचे सर्वात मोठे आश्रयस्थान आहे. इंडियन स्किमर हा पक्षी नदीच्या पात्रात तात्पुरत्या तयार होणाऱ्या वाळूच्या बेटावर आपली घरटी बांधतो आणि अंडी घालतो.मात्र,गेल्या काही वर्षात चंबळच्या खोऱ्यात झालेला बेसुमार बेकायदेशीर वाळू उपसा,धरणांमुळे बदलणारा पाण्याचा प्रवाह,पाण्याचे प्रदूषण आणि नदीकाठच्या मानवी हस्तक्षेपामुळे या पक्ष्यांचा वंश धोक्यात आला.नदीकाठची भटकी कुत्री आणि गुरेढोरे या पक्ष्यांची घरटी आणि अंडी उद्ध्वस्त करत असत.परवीन शेख यांनी यावर केवळ प्रयोगशाळेत संशोधन न करता थेट जमिनीवर उतरून काम सुरू केले. त्यांनी चंबळ नदीकाठच्या गावांमध्ये जाऊन लोकांचे प्रबोधन केले आणि ‘घरट्यांचे रक्षक ‘ही अनोखी मोहीम सुरू केली. नदीकाठच्या तीसहून अधिक स्थानिक तरूणांना त्यांनी या कामासाठी मानधनावर नियुक्त केले.हे रक्षक उन्हातान्हात नदीच्या बेटावर गस्त घालून पक्ष्यांच्या अंड्यांचे कुत्रे आणि चोरांपासून रक्षण करतात. परवीन शेख यांच्या उपाययोजनातून चंबळच्या खोऱ्यात इंडियन स्किमरच्या घरट्यांचा जगण्याचा दर १४ टक्क्यांवरून थेट २७ झाला आहे.२०१७ मध्ये जेथे केवळ ४०० पक्षी मोजले गेले होते, तिथे २०२५-२६ पर्यंत ही संख्या एक हजारच्या पार गेली आहे.

वन्य जीव संशोधक डॉ.बरखा सुब्बा आणि परवीन शेख यांच्या या अभूतपूर्व संवर्धन कार्याची दखल घेऊन, नुकतेच दोघींनाही, जागतिक पातळीवरील पर्यावरण क्षेत्रातील ऑस्कर मानला जाणाऱ्या ‘व्हिटले पुरस्कार २०२६ “देऊन गौरविण्यात आले आहे. लंडनच्या रॅायल जिओग्राफिकल सोसायटी ‘मध्ये जेव्हा युनायटेड किंगडमच्या प्रिन्सेस ॲन यांच्या हस्ते या दोघींना सन्मानित करण्यात आले,तेव्हा तो केवळ या दोन संशोधकांचा गौरव नव्हता,तर भारताच्या कानाकोपऱ्यात स्थानिक समुदायांना सोबत घेऊन लढल्या जाणाऱ्या मूक पर्यावरण चळवळीचा तो सर्वात मोठा जागतिक सन्मान होता.

डॉ.बरखा सुब्बा आणि परवीन शेख यांच्या या यशाने जागतिक पर्यावरण क्षेत्राला एक नवीन दिशा दिली आहे.स्थानिक माणसाला जोपर्यंत त्या प्राण्याबद्दल आपुलकी वाटत नाही आणि त्यांच्या संरक्षणातून स्वतःच्या उपजीविकेचा मार्ग दिसत नाही, तोपर्यंत कोणतीही संवर्धन मोहीम यशस्वी होऊ शकत नाही

# देगलूर-बिलोलीतील शेतकऱ्यांच्या प्रलंबित पिकविमा रकमेबाबत

**आमदार जितेश भाऊ अंतापूरकर विमा प्रश्नावर मुंबईत जोरदार पाठपुरावा मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट**

**लोकनेता न्युज नेटवर्क**
देगलूर ता / वंकलवार प्रभू

देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या प्रलंबित पिकविमा रकमेचे तात्काळ वाटप करण्यात यावे, या मागणीसाठी आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी मतदारसंघातील अनेक शेतकरी अद्याप पिकविमा रकमेपासून वंचित असल्याची बाब मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली. पिकांचे नुकसान होऊनही विमा रक्कम न मिळाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे सांगण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे संबंधित विभागाला तातडीने निर्देश देऊन प्रलंबित



पिकविमा रकमेचे वाटप लवकरात लवकर करण्याची मागणी करण्यात आली. यावर मुख्यमंत्री यांनी विषयाची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्याचे आश्वासन दिले. देगलूर-बिलोली मतदारसंघातील शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, असा विश्वास यावेळी लाडके आमदार मा श्री जितेश भाऊ अंतापूरकर यांनी व्यक्त करण्यात आला.

ऐन पेरणी पूढे जर पिक विमा आणि कर्ज माफी झाली तर शेतकरी मोठ्या आर्थिक संकटातून बाहेर पडेल आणि चालू खरीप साठी खते बियाणे आणि शेतीचे मशागतीसाठी लागणारे आर्थिक व्यवस्था होऊन थोड़ा फार शेतकरी यांना दिलासा मिळेल .

# नांदेड विधान परिषद निवडणूक – “जबाबदाऱ्या चोखपणे पार पाडा” – अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांचे नोडल अधिकाऱ्यांना निर्देश

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
संजय यलमवाड

नांदेड, महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, शांततेत आणि आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पाडण्यासाठी सर्व नोडल अधिकारी व सहाय्यक अधिकाऱ्यांनी आपल्याला सोपवलेली कामे व जबाबदाऱ्या वेळेत पूर्ण कराव्यात, असे स्पष्ट निर्देश अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात विधान परिषद निवडणूक कामकाजाच्या अनुषंगाने नोडल अधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने, निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (रोहयो) हनुमंत कोळेकर, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी



अधिकारी संदीप माळोदे यांच्यासह महसूल, पोलीस, आरोग्य, शिक्षण, माहिती व जनसंपर्क आदी विविध विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

बैठकीत देण्यात आलेल्या महत्त्वाच्या सूचना:

1. जबाबदारीचे काटेकोर पालन: निवासी उपजिल्हाधिकारी तथा सहा. निवडणूक निर्णय अधिकारी किरण अंबेकर यांनी सर्व नोडल व सहाय्यक अधिकाऱ्यांना सांगितले की, मतदान केंद्रांचे व्यवस्थापन, मनुष्यबळ नियोजन, साहित्य पुरवठा, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा व्यवस्था यांसारखी कामे वेळापत्रकानुसार आणि त्रुटीरहितपणे पूर्ण करावीत.

2. आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी: जिल्ह्यात निवडणूक आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता सर्व विभाग प्रमुखांनी घ्यावी. नियमभंग आढळल्यास त्वरित अहवाल सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

3. एफएसटी पथकांची स्थापना: निवडणुकीच्या अनुषंगाने फ्लाइंग स्क्वाड टीम (FST) आणि व्हिडिओ सर्व्हिलन्स टीम (VST) व्हिडीओ कॅमेरासह कार्यान्वित कराव्यात. संशयास्पद हालचालींवर त्वरित कारवाई करावी.

4. मतदान व मतमोजणीचे नियोजन: 18 जून रोजी होणाऱ्या मतदानासाठी मतदान केंद्रांची अंतिम यादी, बॅलेट पेपर व इतर साहित्य वितरण, पोलिंग पार्टींची रवाना व्यवस्था यावर सविस्तर चर्चा झाली. तसेच 22 जूनच्या मतमोजणीसाठी हॉल व्यवस्था, मायक्रो ऑब्झर्व्हर नेमणूक, उमेदवार प्रतिनिधींना परवानगी आदी बाबींचा आढावा घेण्यात आला.

पार्श्वभूमी:
नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातून विधान परिषदेच्या रिक्त होणाऱ्या जागेसाठी द्वैवार्षिक निवडणूक 18 जून 2026 रोजी होणार आहे. जिल्ह्यात एकूण 452 मतदार असून, आतापर्यंत 8 उमेदवारांनी 17 नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. अर्जांची छाननी 2 जून आणि अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख 4 जून आहे.

अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड यांनी शेवटी सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या की, “ही निवडणूक प्रशासनाच्या कार्यक्षमतेसाठी कसोटी आहे. कोणतीही हयगय न करता, आयोगाच्या नियमांनुसार आणि पारदर्शकतेने प्रत्येक टप्पा पूर्ण करा.

# कोळसांगवी-जिरेवाडी रस्ता प्रश्न; लेखी आश्वासनानंतर महिलांचे आमरण उपोषण मागे

**लोकनेता न्युज नेटवर्क**
बाळासाहेब खेडकर पाथर्डी

पाथर्डी तालुक्यातील कोळसांगवी ते जिरेवाडी रस्ता व नदीवरील पुलाच्या मागणीसाठी गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेले महिलांचे आमरण उपोषण अखेर प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर मंगळवारी मागे घेण्यात आले. पंचायत समिती पाथर्डीचे उपअभियंता श्री. राम राजळे यांच्या मध्यस्थीने हा तोडगा निघाला. कोळसांगवी ते जिरेवाडी हा रस्ता व नदीवरील पूल या परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा विषय असून, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी महिलांनी आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणाचा आज तिसरा दिवस होता. यावेळी आमदार मोनिकाताई राजीव राजळे यांनी उपोषणकर्त्यांशी संपर्क साधून रस्त्याबाबत सकारात्मक भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, या रस्त्यासाठी काही दिवसांपूर्वी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत अंदाजपत्रक (इस्टिमेट) तयार करून संबंधित विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. मात्र निधी उपलब्ध न झाल्याने कामाला विलंब झाला. आता पुन्हा पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. तसेच डीपीडीसी, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना किंवा अन्य उपलब्ध योजनेतून या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन त्यांनी दिले.पंचायत समितीचे उपअभियंता श्री. राम राजळे यांनी लेखी आश्वासन देताना सांगितले की, तात्पुरत्या स्वरूपात तीनशे ते चारशे फूट पांदीच्या रस्त्यावर तत्काळ सेलिंग व मुरूम टाकून वाहतुकीसाठी सोय करण्यात येईल. तसेच जिल्हा परिषद किंवा इतर योजनांच्या माध्यमातून प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवून मंजुरी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील व रस्त्याचे कायमस्वरूपी काम पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.

या लेखी आश्वासनानंतर उपअभियंता राम राजळे यांच्या हस्ते उपोषणकर्त्या महिलांना पाणी पाजून आमरण उपोषण सोडण्यात आले.उपोषणात लोकनियुक्त सरपंच सौ. सुरेखा युवराज फुंदे, सौ.




खतिजाबी शेख, सौ. कमल धनवडे, सौ. कमल माळी, सौ. गंभिराबाई पेटारे, सौ. छबाबाई जाधव, सौ. सायरा बाबुलाल शेख, सौ. मनीषा साळवे, सौ. शोभा पेटारे, सौ. शिंदुबाई पेटारे, सौ. संगीता कुसळकर, सौ. विमल माळी, सौ. द्रौपदी साळवे, सौ. चंद्रकला कुसळकर, सौ. आशाताई जाधव, सौ. आबिदाबी शेख, प्रयागाबाई वाकडे, आयशाज शेख, शांताबाई धनवडे, तस्लिम शेख, शहानुरा शेख यांच्यासह अनेक महिलांचा सहभाग होता.तसेच उपसरपंच रावसाहेब माळी, सरपंच मुकुंद आंधळे, रवि गाडे, गुलाबराव घुले, युवराज फुंदे, शैकत शेख, ज्ञानदेव साळवे, मुरलीधर साळवे, विकास पेटारे, अतुल घुले, कुंडलिक जाधव, आदेश साळवे, गणेश धनवडे, बबन माळी, विजय कुसळकर, चांगदेव कुसळकर, रोहित घुले, रोहिदास पेटारे, शहानवाज शेख, सुनील पेटारे, धोंडीराम धनवडे, वासुदेव फुंदे, गौतम वाघ, भाऊसाहेब माळी, रियाज शेख, विजय फुंदे, सुखदेव फुंदे, इरफान शेख, कृष्णा धनवडे, अनिल आंधळे, रामेश्वर घुले, विक्रम गायकवाड, बाळू साळवे, नदीम शेख, जगन्नाथ धनवडे, पांडुरंग जाधव, राजू शेख, रवि पेटारे, सचिन गुंजाळ, रोहित कुसळकर, तालिम शेख, श्रीकांत धनवडे आदी ग्रामस्थ, तरुण व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोळसांगवी-जिरेवाडी रस्ता व नदीवरील पुलाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली असून प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी कधी होते याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# औसा तालुक्यात घरकुल योजनेत घोटाळा चौकशीची मागणी

**तालुक्यातील अनेक गावातील घरकुल अर्धवट तर कुठे घरकुल न बांधताच बिले उचल्याची जोरदार चर्चा....**

**दै. लोकनेता न्यूज नेटवर्क**
जीवन जाधव औसा.

औसा तालुक्यातील अनेक गावागावात घरकुल योजनेमध्ये घोटाळा झाल्याची चर्चा असून अनेक गावात घरकुल अर्धवट तर कुठे घरकुल न बांधताच बिले उचल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. औसा तालुक्यात घरकुल योजनेभोवती कथित गैरव्यवहाराचे सावट गडद झाले असून अनेक गावांत घरकुले अर्धवट अवस्थेत राहिल्याच्या, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्यापूर्वीच बिले उचलल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. या प्रकरणामुळे ग्रामीण भागातील गृहनिर्माण योजनेतील पारदर्शकता, देखरेख आणि निधीच्या वापरावर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. औसा तालुक्यातील घरकुल योजनेच्या माध्यमातून प्रत्येक गोरीगरिबांच्या डोक्यावर छत देण्याचे स्वप्न सरकारचा असून या योजनेच्या माध्यमातून गरजू व गोरगरीब लोकांना घरकुल देण्यासाठी एकीकडे सरकार कठीबद्ध असताना मात्र गावातील लोकप्रतिनिधी कोण मात्र या योजनेसाठी गोरगरिबाची पिळवणूक करून एका घरकुलासाठी व घरकुल मंजूर करण्यासाठी दहा ते पंधरा हजार रुपयांचा दर ठरला असून. ठरलेल्या दराप्रमाणे गावपुढारी माध्यमातून प्रशासन दरबारी पैसे दिले की घरकुल मंजुरी होते व घरकुल मंजुरी झाल्यानंतर कुठलही बांधकाम न करता एक तर जुने घर दाखवून किंवा कुठलही बांधकाम न करता बिले उचलण्याचा प्रकार तालुक्यातील अनेक गावांमध्ये झाला आहे.औसा तालुक्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरकुल कामांमध्ये अनियमितता झाल्याच्या अनेक तक्रारी पुढे आल्या असून गावकरी आणि स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांकडून चौकशीची मागणी होत आहे. अनेक ठिकाणी घरकुले केवळ अर्धवट उभारण्यात आली आहेत, तर काही ठिकाणी प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण न होताही हप्त्यांची रक्कम काढण्यात आल्याची चर्चा आहे.

घरकुल योजना ही गरिबांना हक्काचे पक्के घर मिळवून देण्यासाठी राबवली जाणारी महत्त्वाची योजना आहे. त्यामुळे या योजनेत कोणताही गैरव्यवहार झाल्यास त्याचा थेट फटका लाभार्थ्यांना बसतो. औसा तालुक्यातील घरकुल योजनेच्या कामाची उच्यस्तरीय चौकशीची गरज निर्माण झाली आहे. सध्या ग्रामीण भागातील चर्चेनुसार वं माहितीनुसार तक्रारी आणि चर्चांच्या पातळीवर हा मुद्दा जोर धरत आहे ; मात्र प्रशासकीय तपास, लेखापरीक्षण आणि लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष पडताळणीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा स्तरावरील यंत्रणांनी घरकुल लाभार्थ्यांची निवड, मंजुरी, बांधकामाची प्रगती आणि हप्त्यांचे वितरण यावर काटेकोर देखरेख ठेवणे अपेक्षित असते. तरीही काही ठिकाणी स्थानिक कर्मचाऱ्यांच्या



संगनमताने निधीचा अपहार झाल्याची उदाहरणे समोर येत असल्याने योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी अधोरेखित होत आहेत. या पार्श्वभूमीवर औसा तालुक्यातील घरकुल योजनेतील चर्चेतील कथित घोटाळ्याची सखोल चौकशी,वं घरकुल लाभार्थ्यांची प्रत्यक्ष घरकुल पाहणी आणि निधीवाटपाच्या सर्व नोंदींची तपासणी होणे आवश्यक असल्याचे स्थानिक वर्तुळातून सांगितले जात आहे. अशा चौकशीतूनच किती घरकुले अपूर्ण आहेत, कोणत्या टप्प्यावर अनियमितता झाली आणि जबाबदारी कुणाची आहे, हे स्पष्ट होईल. घरकुल योजनेचा मूळ उद्देश गरिबांना सुरक्षित निवारा देण्याचा आहे; परंतु वारंवार समोर येणाऱ्या अनियमितता या उद्देशालाच धक्का देत आहेत. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांचा शासकीय योजनांवरील विश्वास डळमळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे... औसा पंचायत समितीतील अनागोंदी कारभार कारवाईकडे नागरिकांचे लक्ष.

घरकुल योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांनी घरकुल न बांधताच मोठ्या प्रमाणात पैसा उकळल्याची जोरदार चर्चा गावोगावी होत असून. प्रशासनाच्या या मनमानी मुळे शासनाच्या पक्का घर योजनेला घरघर लावण्याचे काम काही कर्मचारी करत आहेत चक्क घरकुल न बांधता चिरीमिरी घेऊन अनेक गावात बोगस घरकुल बिले उचण्याचा प्रकार गावोगावी झाल्याची चर्चा आहे. औसा तालुक्यात घरकुल योजना मंजूर झालेल्या लाभार्थ्यांची मोठी संख्या आहे यापैकी अनेकांनी घरकुल बांधले नाहीत तरी त्यांची सर्व बिले अदा करण्यात आली असल्याची चर्चा असून मोठ्या प्रमाणात शासकीय निधीचा गैरवापर झाला असल्याचे बोलले जात असून काही ठिकाणी तरी एकाच घरावर दोन तीन बिले काढल्याची चर्चा सुरू आहे..काही घरकुल विभागातील कर्मचारी ॲप वर कुठलेही फोटो अपलोड करून तसेच जिओ टॅगिंग मध्ये फोटो एक ठिकाणचा घर दुसऱ्याचे असे चित्र आहे. औसा तालुक्यात अनेक ठिकाणी सरपंचांच्या नातेवाईकांचा ग्रामपंचायत कामामध्ये हस्तक्षेप वाढला असल्याने शासकीय योजनेचे तीनतेरा वाजले असून जे गाव पातळीवर काम करणारे कर्मचारी यांच्यावर दबाव टाकत आपणाला पाहिजे तसे काम करून घेत असल्याचे चित्र आहे.तरी तालुक्यातील गावोगावी राबविण्यात आलेली घरकुल योजनेची सखोल चौकशी व्हावी वं संबंधितावर कारवाई करण्याची मागणी केली जातेय...

# पत्रकारिता व समाजसेवेत उल्लेखनीय कार्य;

**अनिस कुरेशींना महाराष्ट्र गौरव पुरस्कार**



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
पाचोड प्रतिनिधी | त्रिसिंग जायभाये

पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणारे न्यूज सुपर वन – सत्याचा बुलंद आवाज छत्रपती संभाजीनगरचे प्रतिनिधी तसेच दैनिक लोकपत्रचे पाचोड प्रतिनिधी अनिस कुरेशी यांना प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या कार्याची दखल घेत हा मानाचा पुरस्कार जाहीर करण्यात आला असून, या सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रात त्यांच्या योगदानाची राज्यस्तरावर नोंद घेण्यात आली आहे.

दि. ३० मे रोजी नाशिक येथील गुरुदक्षिणा हॉल येथे देवचंद्र फाउंडेशनच्या सौ. देवयानी आहेर, जयश्रीताई बसते आणि गणेश जगदाळे यांच्या वतीने भव्य महाराष्ट्र गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात राज्यभरातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत अनिस कुरेशी यांना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि गौरवचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. तसेच लोकशाही पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री भागवत वैद्य हे देखील प्रमुख उपस्थितांमध्ये सहभागी होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

# गडचांदूरमध्ये पेट्रोल चोरांचा धुमाकूळ! माता मंदिर चौक परिसरात 7 ते 8 दुचाक्यांमधून पेट्रोल चोरी; पोलिसांनी तातडीने कारवाई करावी



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
चंद्रपूर | सिद्धेश्वर केंद्रे


देशात पेट्रोल-डिझेल टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्याने अनेक वाहनधारकांनी खबरदारीचा उपाय म्हणून आपल्या मोटरसायकल व इतर वाहनांमध्ये अतिरिक्त इंधन साठवून ठेवण्यास सुरुवात केली आहे. मात्र, याच परिस्थितीचा फायदा घेत गडचांदूर शहरात काही भुरटे चोर सक्रिय झाल्याचे दिसून येत असून पेट्रोल चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गडचांदूर येथील माता मंदिर चौक परिसरात एका रात्रीत तब्बल ७ ते ८ दुचाक्यांमधून पेट्रोल चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. सकाळी वाहनधारक वाहन सुरू करण्यासाठी गेल्यानंतर पेट्रोल चोरी झाल्याचे लक्षात आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. या प्रकारामुळे संबंधित वाहनधारकांना आर्थिक फटका बसला असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, पेट्रोल चोरीसारख्या किरकोळ वाटणाऱ्या घटनांकडे दुर्लक्ष केल्यास भविष्यात याच प्रवृत्तीचे गुन्हेगार दुकानफोडी, घरफोडी व इतर गंभीर गुन्ह्यांकडे वळू शकतात. त्यामुळे अशा घटनांना वेळीच आळा घालणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. गडचांदूर शहरात रात्रीच्या गस्तीचा अभाव आणि काही भागांतील अपुरी सुरक्षा व्यवस्था यामुळे भुरट्या चोरांचे फावले असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. विशेषतः माता मंदिर चौक परिसरातील सलग घडलेल्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी, संशयितांचा तातडीने शोध घ्यावा, रात्रीची गस्त वाढवावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.
"आज पेट्रोल चोरी, उद्या मोठी चोरी" अशी परिस्थिती निर्माण होण्यापूर्वीच पोलिसांनी कठोर पावले उचलावीत, अन्यथा नागरिकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल, असा इशाराही काही नागरिकांनी दिला आहे.

# पवन राजे निंबाळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त वृक्षारोपण संपन्न



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
औसा|महेश कोळी

धाराशिव जिल्ह्याचे दिवंगत सुपुत्र पवन राजे निंबाळकर यांनी सहकारातून आर्थिक समृद्धीचे स्वप्न उराशी बाळगून सहकार क्षेत्रामध्ये भरीव प्रगती केली होती त्यांच्या विसाव्या पुण्यतिथी निमित्त श्रीक्षेत्र गोपाळपूर येथे पवन राजे मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी औसा शाखेच्या वतीने केशर आंब्याच्या रोपांची लागवड पत्रकार राम कांबळे यांच्या हस्ते व अभिजीत कुरसुळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी औसा शाखेच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला प्रारंभी पवन राजे निंबाळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी शाखा व्यवस्थापक नरसिंग रावते सोनेतारण कर्ज विभागाचे प्रमुख राजेश सलगर वर्षा देशपांडे करीम शेख अतिश नंजिले सरोजिनी कासेकर योगेश फुलारी बंडू कलमे आदी उपस्थित होते



**लोकनेता न्यूज नेटवर्क**
आज " बावी तालुका शिरुर लोकनेते स्व गोपीनाथजी_मुंडे साहेब" यांच्या प्रतिमेला पुष्पहार' अर्पण करून साहेबांना अभिवादन केले. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ बाबासाहेब ढाकणे Adv रमेश ढाकणे Adv पृथ्वीराज ढाकणे

# ग्रामीण भागातील शेतकरी डिझेलसाठी कॅन घेऊन पेट्रोल पंपावर पेरणीपूर्व मशागतीची कामे ठप्प

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
किनवट:शेख शौकत

खरीप हंगामाच्या पूर्वमशागतीचा शेवटचा टप्पा सुरू असताना डिझेलच्या टंचाईमुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. अनेक पेट्रोल पंपांवर डिझेलचा पुरेसा साठा नसल्याचे सांगून शेतकऱ्यांना डिझेल देण्यास नकार दिला जात असल्याने शेतीची कामे प्रभावित होत आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी डिझेलसाठी कॅन घेऊन पेट्रोल पंपावर जात आहेत. मात्र, त्यांना ट्रॅक्टर घेऊन येण्यास सांगितले जात आहे. अनेक गावांपासून पेट्रोल पंप २० ते ३० किलोमीटर अंतरावर असल्याने ट्रॅक्टर पेरणीपूर्व मशागतीची कामे ठप्प ने-आण करण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडत आहे. सध्या नांगरणी, रोटाव्हेटर आणि इतर मशागतीच्या कामांसाठी ट्रॅक्टरची मोठी गरज आहे. बैलजोड्यांचे प्रमाण कमी झाल्याने बहुतांश शेती यंत्रांवर अवलंबून आहे. मात्र डिझेल उपलब्ध नसल्याने अनेक ठिकाणी ट्रॅक्टर उभे असून मशागतीची कामे रखडली आहेत. काही पेट्रोल पंपांवर' डिझेल उपलब्ध नाही' असे फलक लावण्यात आले असले तरी काही वाहनांना डिझेल पुरवठा होत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. डिझेलचा पुरवठा तातडीने सुरळीत करावा, कृषी कामांसाठी स्वतंत्र डिझेल् कोटा उपलब्ध करून द्यावा आणि शेतकऱ्यांना आवश्यक ते इंधन सहज मिळेल यासाठी प्रशासनाने हस्तक्षेप् करावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत. अन्यथा खरीप हंगामाच्य तयारीवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



# हुमणी अळीपासून पिकांचे संरक्षण; कृषी विभागाचे बांधावर मार्गदर्शन

## सहाय्यक कृषी अधिकारी पी. बी. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली हुमणी नियंत्रण मोहिमेला गती

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
भिगवण | अनिल खाडे

शेतातील पिकांचे हुमणी अळीपासून संरक्षण करण्यासाठी कृषी विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या जनजागृती व मार्गदर्शन मोहिमेला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेअंतर्गत स्थानिक प्रगतशील शेतकरी रामचंद्र जगताप यांच्या शेतावर कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली 'हुमणी ट्रॅप' अर्थात प्रकाश सापळा यशस्वीपणे कार्यान्वित करण्यात आला. या उपक्रमामुळे हुमणी अळीच्या नियंत्रणासाठी प्रभावी, कमी खर्चिक आणि पर्यावरणपूरक पर्याय शेतकऱ्यांसमोर उपलब्ध झाला आहे.
यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी पी. बी. काळे यांनी प्रत्यक्ष शेतावर भेट देऊन शेतकऱ्यांना हुमणी अळीचा प्रादुर्भाव, तिचे जीवनचक्र, पिकांवरील परिणाम तसेच नियंत्रणाच्या विविध उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती दिली. पावसाळ्याच्या प्रारंभी हुमणीचे भुंगेरे जमिनीतून बाहेर पडून अंडी घालण्यास सुरुवात करतात. या टप्प्यात त्यांचे नियंत्रण करण्यात यश आल्यास पुढील काळात अळींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात कमी करता येतो, असे त्यांनी सांगितले. प्रकाश सापळा तयार करण्याची सोपी पद्धत, त्यासाठी लागणारे साहित्य आणि त्याचा प्रभावी वापर कसा करावा याचे प्रात्यक्षिकही यावेळी दाखविण्यात आले. रात्रीच्या वेळी प्रकाशाकडे आकर्षित होणारे हुमणीचे भुंगेरे सापळ्यात अडकून नष्ट होतात. त्यामुळे त्यांच्या प्रजनन प्रक्रियेला आळा बसून पुढील पिढी निर्माण होण्याचे प्रमाण कमी होते. परिणामी पिकांचे होणारे नुकसान टाळण्यास मदत मिळते. मार्गदर्शन करताना सहाय्यक कृषी अधिकारी पी. बी. काळे म्हणाले, "हुमणी अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावपातळीवर सामूहिकरीत्या प्रकाश सापळे उभारणे अत्यंत आवश्यक आहे. शेतकऱ्यांनी रासायनिक कीटकनाशकांचा अतिरेकी वापर टाळून पर्यावरणपूरक व शाश्वत उपाययोजनांचा अवलंब करावा. प्रकाश सापळ्यांच्या माध्यमातून हुमणीच्या भुंगेरांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते." शेतकरी रामचंद्र जगताप यांनी कृषी विभागाचे आभार मानत सांगितले की, कृषी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतात येऊन दिलेले मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरले आहे. प्रकाश सापळ्याचा वापर केल्यास हुमणी नियंत्रणासाठी मोठी मदत होणार असून इतर शेतकऱ्यांनीही या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये हुमणी अळी नियंत्रणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, आगामी काळात अधिकाधिक शेतकऱ्यांनी प्रकाश सापळ्यांचा वापर करून पिकांचे संरक्षण करावे, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.



# परभणीत अन्न व औषध प्रशासनाची धडक कारवाई

## "नियमबाह्य अन्नसाठा जप्त; ३.४७ लाखांचा मुद्देमाल ताब्यात"






**लोकनेता न्यूज नेटवर्क**
परभणी/प्रतिनिधी :- रमेश मुलगीर

परभणी, दि. ३ नागरिकांना सुरक्षित व भेसळमुक्त अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने धडक मोहीम सुरू केली असून या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यांत दोन ठिकाणी कारवाई करून लेबल दोष असलेले बेकरी पदार्थ व खुले खादयतेल यांचा एकूण रुपये ३ लाख ४७ हजार ४४० किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.
राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. दि. ३० मे २०२६ रोजी अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी यांनी परभणी येथील वसमत रोडवरील मे. किसान फूड्स या बेकरीची आकस्मिक तपासणी केली. या बेकरीमध्ये उत्पादित टोस्टच्या पाकीटांवर अन्न सुरक्षा व मानदे कायदा-२००६ नुसार आवश्यक लेबलशिवाय विक्री व अस्वच्छ परिस्थितीत उत्पादन केल्यामुळे चेरी टोस्ट आणि तीळ टोस्ट या अन्नपदार्थांचा एकूण रुपये २८ हजार ८० किमतीचा २८६ किलोग्रॅम वजनाचा साठा जप्त करण्यात आला. तर दि. २ जून २०२६ रोजी परभणी येथील कच्ची बाजार येथील मे. मनियार ट्रेडर्स या पेढीची तपासणी करण्यात आली. या ठिकाणी खुल्या स्वरूपात विक्री करण्यात येणारे सोयाबीन तेल आणि पाम तेलाचा रुपये ३ लाख १९ हजार ३६० किमतीचा १ हजार ९९६ किलोग्रॅम वजनाचा साठा जप्त करण्यात आला.
सदर दोन्ही ठिकाणच्या जप्त साठ्यातून नमुने घेऊन विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले असून विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कायदेशीर कारवाई घेण्यात येणार आहे.
ही कारवाई परभणी येथील अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त (अन्न) श्री. अ. ए. चौधरी आणि छत्रपती संभाजीनगर येथील अन्न व औषध प्रशासनाचे सहा आयुक्त (अन्न) श्री. एस. आर. करकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी वैभव ठोंबरे, कृष्णा मुळे आणि तुषार घोपे यांच्या पथकाने केली. दरम्यान,अन्न व औषध प्रशासनाच्या परभणी कार्यालयातर्फे उन्हाळी मोहिमेअंतर्गत जिल्ह्यांत इतर अन्न पदार्थांसोबतच आंब्याचे चार, बर्फाचे दोन आणि आइसक्रीम फ्रोजन डेझर्ट यांचे ४ नमुने घेण्यात येऊन विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले आहेत. अन्न व औषध प्रशासनाची भेसळखोर, नियमबाह्य अन्नपदार्थ उत्पादक व विक्रेते तसेच प्रतिबंधित अन्नपदार्थ विक्रेते यांच्या विरोधात मोहीम यापुढेही नियमित सुरूच राहणार आहे, असे सहायक आयुक्त श्री. चौधरी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# सोलर कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक?...




**लोकनेता न्यूज नेटवर्क**
बाळासाहेब वैजापूर प्रतिनिधी : अर्जुन शिंदे.

वैजापूर तालुक्यातील बळेगाव येथील शेतकरी अनिल सूर्यवंशी यांच्या गट क्रमांक १२६ मध्ये एप्रिल महिन्यात हिमालया कंपनीचे सोलर पंप बसविण्यात आले होते. मात्र सोलर पंप बसवून अनेक महिने उलटूनही आजपर्यंत या यंत्रणेद्वारे एक लिटरही पाणी उपसा करण्यात आलेला नसल्याचा गंभीर आरोप संबंधित शेतकऱ्यांनी केला आहे.
शेतकरी अनिल सूर्यवंशी यांनी सांगितले की, कंपनीचे कर्मचारी व प्रतिनिधी वारंवार आश्वासने देत असून प्रत्यक्षात समस्या सोडविण्याकडे दुर्लक्ष करत आहेत. कंपनीचे वेगवेगळे प्रतिनिधी असल्याने जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही पुढे येत नाही. अनेकदा फोन करूनही काही प्रतिनिधी कॉल उचलत नाहीत, तर काही जण उडवाउडवीची उत्तरे देत असल्याची तक्रार त्यांनी केली आहे.
दरम्यान, कंपनीकडून एकदा मोटार बदलून देण्यात आली होती. मात्र त्यानंतरही सोलर पंप सुरू झाला नसून शेतकऱ्यांना कोणताही लाभ मिळालेला नाही. त्यामुळे संबंधित शेतकरी आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जात आहेत.
याबाबत दोन दिवसांच्या आत कंपनीने ठोस दखल घेऊन समस्या सोडवावी, अन्यथा ग्राहक मंचाकडे तक्रार दाखल करून कंपनीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा शेतकरी अनिल सूर्यवंशी यांनी दिला आहे. तसेच वेळेत दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचाही इशारा देण्यात आला आहे.

# पावसाळापूर्व कुटंगा-बैरागड रस्त्याचे काम पूर्ण करा;ग्रामस्थांची आक्रमक मागणी

## सहा महिन्यांपूर्वी सुरू झालेले काम अद्यापही अपूर्ण; संताप व्यक्त

**लोकनेता न्यूज नेटवर्क**
धारणी प्रतिनिधी - रजनिश साकले *

कुटंगा: मेळघाट सारख्या अतिदुर्गम भागात रस्त्यांची अवस्था खूपच वाईट झाले आहे. रस्त्यांची दुरावस्था मुळे अपघात,ये- जा आणि आरोग्य सेवा मोठ्या प्रमाणात प्रभावित होतात. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर असताना, गेल्या सहा महिन्यांपूर्वी सुरू झालेले कुटंगा ते बैरागड रस्त्याचे काम अद्यापही अपूर्णच आहे. पहिल्याच पावसात या रस्त्याची दुरवस्था होऊन वाहतूकिची समस्या होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी हे काम तातडीने पूर्ण करावे, अशी आक्रमक मागणी कुटंगा आणि बैरागड येथील ग्रामस्थांनी केली आहे. कुटंगा ते बैरागड या मुख्य रस्त्याच्या कामाला तब्बल सहा महिन्यांपूर्वी प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली होती. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण होते. मात्र, संबंधित कंत्राटदार आणि प्रशासनाच्या संथ कारभारामुळे हे काम अत्यंत धिम्या गतीने सुरू आहे. सहा महिने उलटूनही रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत रखडले आहे. हा रस्ता महाराष्ट्र ते मध्य प्रदेशातील बैतूल, भैसदेही, यांना जोडणारा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. सध्या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे आणि खडी पसरलेली आहे. पाऊस सुरू झाला की या अर्धवट रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होईल. अशा स्थितीत शाळकरी मुले, रुग्ण आणि शेतकऱ्यांना ये-जा करणे अशक्य होईल. जर वेळेत काम झाले नाही, तर वाहतुकीची समस्या निर्माण होऊन अपघात होण्याची दाट शक्यता आहे .



**आंदोलनाचा इशारा**

"रस्त्याचे काम रडतखडत सुरू असल्याने वाहनधारकांना, शारीरिक व मानसिक त्रास होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेऊन कंत्राटदाराला तात्काळ काम पूर्ण करण्याचे आदेश द्यावेत. पावसाळा सुरू होण्यापूर्वी रस्ता वाहतुकीसाठी योग्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल." असा इशारा सामाजिक कार्यकर्ता श्री नंदराम धिकार यांनी दिला आहे

